|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University , Jalgaon**

## राष्ट्रीय सेवा योजना कक्ष

जा.क्र.कबचौउमवि/रासेयो-१४-क/अध्यादेश/१६३/९३/२०२६ दि.२५/०३/२०२६

**प्रति,**

**मा.प्राचार्य / संचालक / विभाग प्रमुख,**
**राष्ट्रीय सेवा योजनेचे शासन अनुदानित व स्वंयनिर्वाहित एकक असलेले महाविद्यालये,**
**मान्यता प्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना...**

**विषय :-** विद्यापीठ अध्यादेश १६३ अंतर्गत प्रोत्साहन गुणांचे MKCL ADES पध्दतीने Entry करणेबाबत...

**संदर्भ:-**जा.क्र.कबचौउमवि/रासेयो-१४-क/अध्यादेश/१६३/८१/२०२६, दि.०६/०३/२०२६

**महोदय/ महोदया,**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव संलग्न महाविद्यालय,मान्यता प्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा विभाग यामध्ये नियमित शिक्षण घेणारे विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) उपक्रमात सहभागी होऊन सलग दोन शैक्षणिक वर्षात सहभाग व त्या कालावधीत एक विशेष शिबीर पुर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मागणीनुसार विद्यापीठ अध्यादेश १६३ तरतूदी अंतर्गत प्रोत्साहनपर १० गुणांचा लाभ आपल्या शिफारसी अन्वये दरवर्षी देण्यात येत असतो. त्या अन्वये संदर्भीय परिपत्रकान्वये आवाहन करुन अध्यादेश १६३ नुसार प्रोत्साहन पर गुणलाभ मिळण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज अभासी पध्दतीने (Online) दि.३१ मार्च,२०२६ पर्यंत कार्यवाही करण्याविषयी आपणास कळविण्यात आलेले आहे.

अध्यादेश गुणलाभ कार्य जलद होण्याकरीता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ व २०२५-२६ या सलग शैक्षणिक वर्षात **राष्ट्रीय सेवा योजनेत** (NSS) सहभागी होऊन एक विशेष शिबीर (सात दिवसीय निवासी) पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचे अध्यादेश १६३ नुसार प्रोत्साहनपर गुण मा.प्राचार्य, संचालक, विभाग प्रमुख यांचेकडून ई-पध्दतीने (MKCL ADES पध्दतीने Entry) करण्याच्या कार्यपध्दती खालील प्रमाणे वापरण्यात यावी.

१. विद्यापीठ अध्यादेश क्र.१६३ (NSS) राष्ट्रीय सेवा योजना तरतुदीनुसार पात्र विद्यार्थ्यांच्या गुण याद्यांच्या त्रुटींचे निराकरण झाल्यानंतर MKCL ने विकसित केलेला Assesment Data Entry Software (ADES) द्वारे राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्राअंतर्गत प्रोत्साहनपर १० गुणांची नोंदणी करावयाची आहे.


२. विद्यापीठ अध्यादेश क्र. १६३ राष्ट्रीय सेवा योजना तरतुदीनुसार Assesment Data Entry Software (ADES) द्वारे तयार झालेल्या गुणयाद्या व सोबतच्या नमुन्यातील हमीपत्र महाविद्यालय लॉगीन मध्ये Assesment Data Entry -- >> Report -- >> Marks List या Link द्वारे तयार कराव्यात.

३. Software द्वारे तयार केलेल्या गुणयाद्यांची प्रिंट अचुक असल्याची खात्री संबंधित राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी करावी.काही दुरुस्त्या असल्यास अश्या दुरुस्त्या Software मध्ये घेण्यात याव्यात.त्याची Correction List Print घेवून त्यावर संबंधित राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी आणि मा.प्राचार्य /संचालक /विभागप्रमुख यांनी सदर Software Print प्रमाणित करुन त्यावर स्वाक्षरी करुन आपला शिक्का प्रकट करावा व गुणयाद्या ई-पध्दतीने राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या nss@nmu.ac.in या ई-पत्यावर दि.१५/०४/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी पाठवाव्यात.त्याची Hard Copy दि. २५/०४/२०२६ पर्यंत रासेयो कक्षास सादर करावी. दि.१५/०४/२०२६ रोजी सदर online गुण सादर करावयाची Link MKCL मार्फत बंद करण्यात येईल.अध्यादेश १६३ अंतर्गत गुणलाभाची प्रक्रीया नमुद वेळेत पुर्ण करण्यात यावी.

आपणास कळविण्यात येते की,पत्रकातील निर्देशाप्रमाणे कार्यवाही करुन Assesment Data Entry Sofware (ADES) द्वारे विद्याशाखा, वर्गनिहाय,अशा वेगवेगळया (स्वतंत्र) पध्दतीने प्रिंटकाढून रासेयो कक्षास जमा करण्यात यावी.

**टिप :-** आभासी पध्दतीने (online) ज्या रासेयो स्वंयसेवकांची माहिती परीपूर्ण अपलोड केलेली असेल अशाच स्वंयसेसकांची अध्यादेश १६३ अंतर्गत प्रोत्साहन गुणांचे MKCL ADES पध्दतीने Entry करण्यात यावी.

**आपला विश्वासू,**



**( प्रा. व्हि. एम. रोकडे )**
**संचालक, राष्ट्रीय सेवा योजना**

**प्रतिलिपी-**

१) मा.संचालक,परीक्षा व मुल्यमापन मंडळ, कबचौउमवि,जळगाव

२) समन्वयक, विद्यार्थी ई- सुविधा कक्ष (MKCL), कबचौउमवि,जळगाव

३) विभाग-जिल्हा रासेयो समन्वयक

**प्रत :-**

१) मा. विभाग प्रमुख, कुलगुरु कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव.

२) मा. विभाग प्रमुख, प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव.

३) मा. विभाग प्रमुख, कुलसचिव कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव.

४) पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र प्रशाळा, कबचौ उमवि, जळगाव.

D/kka/0.163 Circular/127/2024-25

# राष्ट्रीय सेवा योजना कक्ष

जा.क्र.कबचौउमवि/रासेयो-१४-क/अध्यादेश/१६३/९४/२०२६ दि.२५/०३/२०२६

**प्रति,**

मा. प्राचार्य / संचालक/विभाग प्रमुख,

राष्ट्रीय सेवा योजनेचे शासन अनुदानित व स्वंयनिर्वाहित एकक असलेले महाविद्यालये,

मान्यता प्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना...

**विषय :-** विद्यापीठ अध्यादेश १६३ अंतर्गत प्रोत्साहन गुणांचे अर्ज (आभासी पध्दतीने) सादर करणेबाबत...

संदर्भ :-जा.क्र.कबचौउमवि/रासेयो-१४-क/अध्यादेश/१६३/८१/२०२६,दि.०६/०३/२०२६

**महोदय / महोदया ,**

संदर्भीय परिपत्राकान्वये सेवा योजना (N.S.S) मध्ये सहभाग नोंदवून उल्लेखनीय कार्य केलेल्या पात्र विद्यार्थ्यांचे प्रोत्साहनपर गुणलाभ मागणी अर्ज सोमवार **दि.२५ मार्च,२०२६ पर्यंत** रासेयो कार्यक्रम अधिकारी, मा. प्राचार्य, रासेयो जिल्हा समन्वयक यांच्याकडून पडताळणी करुन संकेतस्थळावर अपलोड करण्यात यावे असे कळविण्यात आलेले आहे. बऱ्याच रासेयो एकक कार्यक्रम अधिकारी यांनी अध्यादेश १६३ अर्ज अपलोड करण्याची कार्यवाही केलेली नाही.

प्रस्तुत अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S) मध्ये सहभाग नोंदवून उल्लेखनीय कार्य केलेल्या पात्र विद्यार्थ्यांचे प्रोत्साहनपर गुणलाभ मागणी अर्ज अपलोड करण्यास मुदत वाढ मंगळवार **दि. ३१ मार्च, २०२६ पर्यंत** देण्यात येत आहे.रासेयो कार्यक्रम अधिकारी, मा. प्राचार्य, रासेयो जिल्हा समन्वयक यांच्याकडून पडताळणी करुन संकेतस्थळावर अपलोड करण्यात यावे. दि. ३१ मार्च, २०२६ नंतर लींक बंद करण्यात येईल. MKCL ने विकसित केलेला Assesment Data Entry Software (ADES) द्वारे राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्राअंतर्गत प्रोत्साहनपर १० गुणांची नोंदणी केल्यानंतर तद्नंतर आपले प्रतिनिधीव्दारे अपलोड केलेल्या अर्जांची प्रत काढून त्या सोबत सात दिवसीय शिबीर उपस्थिती पत्राची सत्य प्रत जिल्हा समन्वयक यांचे कडून पडताळणी करुण मा. प्राचार्य / संचालक यांच्या शिफारशीसह विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षास सादर करावेत.

आपला विश्वासू,

**(प्रा. व्हि. एम. रोकडे )**

संचालक,राष्ट्रीय सेवा योजना

**टिपः-**१. सन-२०२४-२५ चे विशेष शिबीर उपस्थितीपत्रक सत्यप्रत (photocopy) विद्यार्थी अर्ज, (Hard Copy) विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षात जमा कराव्यात.

२.अध्यादेश १६३ अर्ज आपल्या महाविद्यालयाचे लॉगीन (Login) (https://apps.nmu.ac.in ) मधून ऑनलाईन (Online) भरण्यासाठी मा. प्राचार्य, रासेयो कार्यक्रम अधिकारी यांच्या ईमेल आयडीवर टाकण्यात आलेला आहे कृपया त्या नुसार प्रोत्साहन पर गुणलाभ अर्ज अपलोड करण्याची प्रकीया करण्यात यावी.

**प्रतिलिपी :-**१) विभाग-जिल्हा राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक, २) मा.संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, कबचौ उमवि, जळगाव

**प्रत :-**१) विभाग प्रमुख, कुलगुरु कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव २) विभाग प्रमुख, प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव ३) विभाग प्रमुख, कुलसचिव कार्यालय,कबचौ उमवि, जळगाव ४) जपसंपर्क अधिकारी, कबचौ उमवि,जळगाव ५) पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र, कबचौ उमवि, जळगाव-कृपया सदरच्या पत्रकास प्रसिध्दी व विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकट करण्याची कार्यवाही करावी D: kka Ord. 163 Circular 216